

साबळेच्या यशात स्नेसारेव्ह यांचे योगदान

भारताच्या अनेक ॲथलेटिक्सपटूंचा दृष्टिकोन बदलण्यात महत्त्वाची भूमिका

एक्स्प्रेस वृत्त, नवी दिल्ली

नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ३००० मीटर स्टिपलचेसमध्ये अविनाश साबळेने भारतासाठी रौप्यपदक जिंकले. याच साबळेने २०१८ मध्ये नवीन राष्ट्रीय विक्रम रचला. त्याच्या अलौकिक यशामागे दिवंगत प्रशिक्षक आणि प्रेरक निकोलाइ स्नेसारेव्ह यांचा खऱ्या अर्थाने वाटा होता. अविनाश या कामगिरीनंतर त्यांना वंदन करण्यास विसरला नाही.

साबळेने गेल्या चार दशकांचा गोपाल सैनी यांनी स्थापित केलेला राष्ट्रीय विक्रम ८:२९.८० सेकंद वेळ नोंदवत चार वर्षांपूर्वी मोडीत काढला. ही कामगिरी करूनही त्याच्या मनात अनेक प्रश्न होते. ''मी यापेक्षा उत्तम कामगिरी करेन, याबाबत खात्री नव्हती. मी ८:२९ सेकंद वेळ नोंदवली. हीच वेळ पुन्हा नोंदवेन, याचा विश्वास मला नव्हता. अनेक ॲथलेटिक्सपटूंनी ८:३५, ८:३६ सेकंद अशा वेळा नोंदवल्या आहेत. मात्र त्यांनीही ही कामगिरी केल्यानंतर त्याची पुनरावृत्ती केली नाही,'' असे साबळे म्हणाला.

गतवर्षी मार्चमध्ये बेलारूसच्या स्नेसारेव्ह यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने भारताच्या लांबपल्ल्यांच्या धावपटूंना धक्का बसला होता. स्नेसारेव्ह टोक्यो ऑलिम्पिकसाठी साबळेला मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. ५ मार्चला पतियाळाच्या राष्ट्रीय क्रीडा संस्थेतील खोलीत ते मृतावस्थेत आढळले.

साबळेला किर्गिस्तानमधील सराव शिबिराला जाता आले नाही. त्यानंतर स्नेसारेव्ह यांनी टोक्यो ऑलिम्पिकपर्यंत आपला करार मोडीत काढून २०१९ मध्ये माघार घेण्याचा निर्णय घेतला. टोक्यो ऑलिम्पिकआधी साबळेने आपले सेनादलाचे प्रशिक्षक अमरिश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करण्याचा निर्णय घेतला. साबळेच्या हृदयात स्नेसारेव्हला वेगळे स्थान होते.

''प्रशिक्षक म्हणून निकोलाइ यांनी माझ्यासाठी जे केले, ते मी विसरणार नाही. माझ्या आयुष्यात अनेक प्रशिक्षक आले आणि अनेकांनी मला काही सकारात्मक गोष्टी शिकवल्या. निकोलाइ यांनी माझा दृष्टिकोन बदलला. मी त्यांच्यासारखा प्रामाणिक प्रशिक्षक पाहिला नाही. त्यांचे अकाली जाणे माझ्यासाठी कठीण काळ होता. त्यानंतर मी अस्वस्थही झालो,'' असे साबळेने सांगितले.

कडक प्रशिक्षक, आहारतज्ज्ञ, स्वयंपाकी

स्नेसारेव्ह २००५ मध्ये पहिल्यांदा भारतात आले होते. पाच वर्षांनी प्रीजा श्रीधरन आणि कविता राऊत यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेतील १० हजार मीटर प्रकारात अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक जिंकले. याच स्पर्धेत सुधा सिंगने स्टिपलचेसमध्ये सुवर्ण कामगिरी केली. जे खेळाडू स्नेसारेव्ह यांचा सराव कार्यक्रम प्रामाणिकपणे करण्याच्या तयारीत होते, त्या खेळाडूंनाच स्नेसारेव्ह मार्गदर्शन करत असत. स्पर्धेच्या ठिकाणी खेळाडू एकमेकांशी बोलायलाही घाबरायचे इतका स्नेसारेव्ह यांचा दरारा होता. ते खेळाडूंसाठी चांगले जेवण बनवायचे. ते खेळाडूंसाठी प्रशिक्षक, आहारतज्ज्ञ यांसारख्या अनेक भूमिका पार पाडायचे. खेळाडू जे काही खायचे त्यावर त्यांची नजर असायची.

विश्वचषक फुटबॉल स्पर्धेला एक दिवस आधी प्रारंभ?

एपी, जिनेव्हा

कतारमध्ये 'फिफा' विश्वचषक फुटबॉल स्पर्धेला एक दिवस आधी प्रारंभ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यजमान कतार विरुद्ध इक्वेडर यांच्यातील सलामीचा सामना २० नोव्हेंबरला होऊ शकेल.

विश्वचषक स्पर्धेला आधीच्या कार्यक्रमपत्रिकेनुसार २१ नोव्हेंबरला, सोमवारी सुरुवात होणार होती. दोहा येथे नेदरलँड्स आणि सेनेगल यांच्यात पहिला सामना, तर इंग्लंड-इराण यांच्यात दुसरा सामना होणार होता. अ-गटातील कतार-इक्वेडर यांच्यातील सामना त्याच दिवशी सहा तासांनी होणार होता. त्यामुळे स्पर्धेचा उद्घाटन सोहळा हा तिसऱ्या सामन्यापर्यंत लांबतो आहे. हा सामना होत असलेल्या अल बेट स्टेडियमची प्रेक्षकसंख्या ६० हजारांइतकी आहे. दोहा येथे १ एप्रिलला निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकात २८ दिवसांचे नियोजन करण्यात आले. परंतु ताज्या योजनेत २९ दिवसांचा समावेश करण्यात आला आहे.

युरोपमधील लीग स्पर्धा १३ नोव्हेंबर पर्यंत चालत असल्यामुळे 'फिफा'ने २८ दिवसांच्या कार्यक्रमाला मान्यता दिली होती. कतार आणि इक्वेडोरमधील खूप कमी खेळाडू युरोपमध्ये खेळत असल्यामुळे यजमान कतारला उद्घाटनाचा सामना खेळण्याची संधी मिळेल.

विश्वचषकाची तिकिट विक्री यापूर्वीच झाली आहे. आता या बदलामुळे फुटबॉल रसिकांनाही प्रवासाचा कार्यक्रम बदलावा लागू शकेल. विश्वचषक फुटबॉल स्पर्धेचे यजमानपद कतारला देण्याचा निर्णय २०१०मध्ये घेण्यात आल्यानंतर चार वर्षांनी 'फिफा'ने स्पर्धेच्या तारखेत प्रथमच बदल केला होता. आता सात वर्षांनी पुन्हा एकदा स्पर्धेच्या तारखांमध्ये बदल करण्याची स्थिती उद्भवली आहे.

अपयशावर मात करण्याची कोहलीकडे क्षमता -जयवर्धने

पीटीआय, दुबई

संग्रहित छायाचित्र

भारताचा आघाडीचा फलंदाज विराट कोहली अपयशाच्या गर्तेतून जात असला, तरी यावर मात करण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. तो लवकरच यातून बाहेर पडेल, असे मत श्रीलंकेचा माजी कर्णधार माहेला जयवर्धनेने व्यक्त केले आहे.

ऑगस्टच्या अखेरच्या आठवड्यात सुरू होणाऱ्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेसाठी कोहली आणि लोकेश राहुल यांचे भारतीय संघात पुनरागमन झाले आहे. कोहली कारकीर्दीत प्रथमच कठीण कालखंडातून जात आहे. कोहलीने नोव्हेंबर २०१९ पासून आंतरराष्ट्रीय स्तरावर एकही शतक झळकावलेले नाही. भारतीय संघाच्या अलीकडेच झालेल्या इंग्लंड दौऱ्यातही कोहली सहा डावांत केवळ ७६ धावाच करू शकला होता. त्यानंतर झालेल्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या आणि आगामी झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेतूनही त्याला वगळण्यात आले.

''कोहलीच्या बाबतीत सध्या जे काही होत आहे, ते दुर्दैवी आहे. पण तो गुणी खेळाडू आहे. कोहलीच्या खेळात दर्जा आहे आणि तो कायम टिकून असतो, अपयश तेवढ्यापुरतेच असते. यासाठी त्याला जास्तीत जास्त सामने खेळायला मिळण्याची आणि त्याने खेळपट्टीवर अधिक काळ टिकून राहण्याची गरज आहे,'' असे जयवर्धने म्हणाला.

भारताने सलामीसाठी डावखुऱ्या फलंदाजांचा विचार करण्याची गरज असून यासाठी ऋषभ पंत हा उत्तम पर्याय असेल, असेही जयवर्धनेने स्पष्ट केले. ''कुठल्याही क्रमांकावर पंत खेळायला आला तरी त्याचा खेळ बदलत नाही. ही त्याची नैसर्गिक गुणवत्ता आहे म्हणूनच भारताने त्याला सलामीला खेळवण्याचा विचार करावा,'' असे जयवर्धनेने सांगितले.

''इंडियन प्रीमियर लीगनंतर राहुल फार क्रिकेट खेळलेला नाही. त्यामुळे तो कितपत प्रभावी ठरू शकेल,'' अशी शंकाही जयवर्धनेने उपस्थित केली आहे.

मुंबई मॅरेथॉन पुढील वर्षी १५ जानेवारीला

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर मुंबई मॅरेथॉन शर्यतीचे पुनरागमन होत आहे. पुढील वर्षीच्या तिसऱ्या रविवारी म्हणजेच १५ जानेवारी रोजी ही शर्यत होईल. मुंबई मॅरेथॉनचे हे १८वे पर्व असेल.

मुंबई मॅरेथॉनने केवळ मुंबई आणि भारतातच नव्हे, तर क्रीडा विश्वात मानाचे स्थान निर्माण केले आहे. मॅरेथॉनचे मुख्य प्रवर्तक असणाऱ्या प्रोकॅम इंटरनॅशनलने बुधवारी ही घोषणा केली. शर्यतीसाठी नोंदणीला गुरुवारपासूनच प्रत्यक्ष आणि ऑनलाइन पद्धतीने प्रारंभ होणार आहे.

या मॅरेथॉनला छत्रपती शिवाजी स्थानकाजवळून सुरुवात होईल. शर्यतीत मुख्य मॅरेथॉनसह अर्धमॅरेथॉन, १० किमी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि ड्रीम रन अशा विविध शर्यतींचा समावेश आहे.

''जगातील अव्वल १० मॅरेथॉन शर्यतीमध्ये या शर्यतीचा समावेश होतो. ही मुंबई आणि देशासाठी अभिमानाची बाब आहे. या निमित्ताने सर्व स्तरातील लोक एकत्र येतील आणि एक वेगळाच आनंद अनुभवायला मिळेल,'' असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

प्रशासकीय समितीकडून पटेल यांच्याविरोधात अवमान याचिका

नवी दिल्ली : अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचा (एआयएफएफ) कारभार पाहणाऱ्या प्रशासकीय समितीने (सीओए) पदच्यूत करण्यात आलेले अध्यक्ष प्रफुल पटेल यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली आहे.

''पटेल यांनी न्यायालयाच्या कार्यवाहीत हस्तक्षेप करण्याच्या हेतूने ३५ राज्य संघटनांची बैठक घेतली. ८ ऑगस्टला सकाळी ११ वाजता झूमवर आयोजित केलेल्या या बैठकीची महितीदेखील देण्यात आली आहे,'' असे अवमान याचिकेत प्रशासकीय समितीने म्हटले आहे. याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचा अवमान करून हस्तक्षेप केला असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. याचिकेत पटेल यांना 'फिफा' आणि आशियाई फुटबॉल महासंघाच्या (एएफसी) पदांपुरते मर्यादित न राहता फुटबॉलशी संबंधित कोणत्याही पदांचा लाभ घेण्यापासून रोखण्याची विनंती केली आहे.

संक्षिप्त

तलवारबाजी : भवानी देवीला सुवर्ण

लंडन : भारताच्या गतविजेत्या भवानी देवीने राष्ट्रकुल तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. जागतिक क्रमवारीत ४२व्या क्रमांकावरील भवानीने मंगळवारी महिलांच्या वैयक्तिक सॅब्रे प्रकाराच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या मानांकित व्हेरोनिका व्हॅसिलेव्हाला १५-१० असे हरवले. ''अंतिम सामना आव्हानात्मक होता. देशासाठी आणखी एक सुवर्णपदक जिंकू शकले, याचा अभिमान वाटतो. यंदाच्या वर्षात माझी उत्तम वाटचाल सुरू आहे,'' असे भवानीने सांगितले.

प्रीमियर बॅडमिंटन लीग १७ डिसेंबरपासून

नवी दिल्ली : प्रीमियर बॅडमिंटन लीगचा (पीबीएल) सहावा हंगाम १७ डिसेंबर २०२२ ते १४ जानेवारी २०२३ दरम्यान पार पडणार आहे. करोनाच्या साथीमुळे गेली दोन वर्षे ही लीग खेळवण्यात आली नव्हती. या लीगच्या गेल्या पाच हंगामांत सायना नेहवाल, पीव्ही सिंधू आणि किदम्बी श्रीकांत तसेच ऑलिम्पिक विजेती कॅरोलिना मारिन, व्हिक्टर एक्सेलसेन, ताई त्झू यिंग आणि ली चोंग वेई यांच्यासारख्या जगातील दिग्गज खेळाडूंचा सहभाग होता.

डायनामो कीव्ह चॅम्पियन्स लीग प्ले-ऑफमध्ये

जिनेव्हा : डायनामो कीव्हची चॅम्पियन्स लीगमध्ये प्रवेश मिळवण्यासाठीचा स्वप्नवत प्रवास अजूनही सुरूच आहे. त्यांनी तिसऱ्या पात्रता फेरीत स्टर्म ग्राझवर अतिरिक्त वेळेत २-१ असा विजय मिळवला. साखळी फेरीत पोहोचण्यापासून आता ते केवळ दोन सामने दूर आहेत. डायनामोकडून कोस्टियांटीन व्हिवचारेन्को (९७व्या मिनिटाला) आणि मध्यरक्षक व्हिक्टर शानकोव्ह (११२व्या मि.) यांनी गोल करत संघासाठी निर्णायक भूमिका पार पाडली.

बांगलादेशाचा झिम्बाब्वेवर १०५ धावांनी विजय

हरारे : फलंदाजीला पोषक असणाऱ्या खेळपट्टीवर बांगलादेश संघाने बुधवारी झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेचा १०५ धावांनी विजय मिळवला. तीन सामन्यांची मालिका झिम्बाब्वेने २-१ अशी जिंकली. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेश संघाने ९ बाद २५६ धावांची मजल मारली होती. आव्हानाचा पाठलाग करतााान झिम्बाब्वेचा डाव ३२.२ षटकांत १५१ धावांत आटोपला.

मुंबई इंडियन्सच्या मालकीचे दोन संघ परदेशी लीगमध्ये

मुंबई : मुंबई इंडियन्स संघाची मालकी असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने 'यूएई' आंतरराष्ट्रीय लीग ट्वेन्टी-२० आणि क्रिकेट दक्षिण आफ्रिका ट्वेन्टी-२० लीगमधील आपल्या दोन संघांची घोषणा ही बुधवारी केली. हे दोन्ही संघ 'एमआय' एमिरेट्स (युएई आंतरराष्ट्रीय लीग) आणि 'एमआय' केप टाऊन (दक्षिण आफ्रिका लीग) या नावाने संबोधले जातील.

टेनिस : ओसाका पहिल्याच फेरीत गारद

टोरंटो : जपानची नाओमी ओसाकाची अपयशी कामगिरी कायम राहिली. टोरंटो येथील नॅशनल बँक खुल्या टेनिस स्पर्धेत ओसाकाने पहिल्या फेरीच्या लढतीतच पाठीच्या दुखापतीमुळे माघार घेतली. लढत सोडण्याचा निर्णय घेतला, तेव्हा ओसाका इस्टोनियाच्या काया कानेपीविरुद्ध ६-७ (४-७), ०-३ अशी पिछाडीवर होती. अन्य लढतीत कोको गॉफ, चीनची झेंग क्वीनवेन यांनी विजय मिळवला.

ब्रिजभूषण सिंग राष्ट्रकुल कुस्ती समितीवर

नवी दिल्ली : भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंग यांची राष्ट्रकुल कुस्ती संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेदरम्यान बर्मिंगहॅम येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा समितीच्या वार्षिक बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. प्रथमच एखाद्या भारतीय संघटकास राष्ट्रकुल समितीत स्थान मिळाले आहे.

राज्य कुस्ती निवड चाचणी उद्यापासून

पुणे : भारतीय कुस्तीगीर महासंघातर्फे घेण्यात येणाऱ्या १५ आणि २० वर्षांखालील फेडरेशन चषक कुस्ती स्पर्धेसाठी शुक्रवारपासून राज्य निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य कुस्तीगीर संघटनेच्या हंगामी समितीकडून ही चाचणी घेण्यात येणार आहे. चाचणी वारजे येथील सह्याद्री कुस्ती संकुल येथे होणार आहे. पहिल्या दिवशी वजने होतील आणि त्यानंतर १३ ते १८ ऑगस्ट दरम्यान फ्री-स्टाईल आणि ग्रीको रोमन प्रकाराच्या चाचणी होतील.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडा घटक)

ई-निविदा सूचना

ई-निविदा क्र. का.अ./फ-द/मुं.इ.दु.व पु.मं./१२/२०२२
Main Portal : https://mahatenders.gov.in
MHADA Portal : https://mhada.maharashtra.gov.in

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी. फ-दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३ रा मजला, परेल, मुंबई-४०००१२ यांच्याकडे म्हाडा, सार्वजनिक बांधकाम खाते, महानगरपालिका व विविध इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून **उपकरप्राप्त इमारतींच्या मंडळ निधीद्वारे दुरुस्ती कामाकरिता** एकूण ०१ कामाकरिता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे [ऑनलाइन] निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील.

सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे -

अ. क्र.	टप्पा	कालावधी	अ. क्र.	टप्पा	कालावधी
१.	निविदा विक्री सुरू	१२.०८.२०२२ सकाळी १०.१०	२.	निविदा विक्री बंद	२६.०८.२०२२ सायं. ०५.४०
२.	तांत्रिक बोली उघडणे	२९.०८.२०२२ सकाळी ११.००	४.	आर्थिक बोली उघडणे	२९.०८.२०२२ सकाळी ११.००

म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
सही/-
कार्यकारी अभियंता/फ [दक्षिण] विभाग,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
सीपीआरओ/ए/४७८

मध्य रेल्वे
खुली निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि करिता विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एसअँडटी), पहिला मजला, पार्सल ऑफिस बिल्डिंग, प्लॅटफॉर्म नं. १४ व १५, मध्य रेल्वे, मुंबई सीएसटी ४०० ००१ हे नामांकित कंत्राटदारांकडून खुल्या निविदा मागवीत आहेत. निविदेच्या सादरीकरणाची तारीख व वेळ १३.०९.२०२२ रोजी दु. ०३.०० वा.पर्यंत आहे आणि त्याच दिवशी दु. ०३.१५ वा. उघडण्यात येतील. **कामाचे नाव :** मुंबई विभागाच्या उत्तर अनुभागातील ठाकूरवाडी, टिटवाळा व वाशिंद स्थानकांकडील मेसर्स सिमेन्स लि./वेस्टरेस मेकच्या इलेक्ट्रॉनिक्स इंटरलॉकिंग सिस्टमचे वार्षिक देखभाल कंत्राट. **निविदा सूचना क्र. सीआर / बीबी / एसअँडटी / नॉर्थ / २०२२/ २५. अदमासे किंमत :** रु. ५६.३० लाख. **उघडण्याची तारीख :** १३.०९.२०२२. **इरठे :** रु. ११२७००/-. **वैधता :** ६० दिवस. **पूर्तता कालावधी :** ३६ महिने. **कामाचे नाव :** केवायएन-आयजीपी अनुभागावरील रोड ओव्हर ब्रीज (आरओबी) किमी ६४/३०-३१ च्या प्रस्तावित बांधकामासंबंधित सिग्नलींग काम. **निविदा सूचना क्र. सीआर/बीबी/एसअँडटी/नॉर्थ/२०२२/२६. अदमासे किंमत :** रु. १४.३२ लाख. **उघडण्याची तारीख :** १३.०९.२०२२. **इरठे :** रु. २८७००/-. **वैधता :** ६० दिवस. **पूर्तता कालावधी :** ०६ महिने. ही निविदा दिनांकित १५.०६.२०१७ पब्लिक प्रोक्युअरमेंट पॉलिसी (मेक इन इंडिया)चे अनुपालन करते. निविदांचा संपूर्ण तपशील **www.ireps.gov.in** या मध्य रेल्वेच्या कार्यालयीन वेबसाइटवर उपलब्ध आहे. संपूर्ण निविदा कागदपत्रे वेबसाइटवरून डाऊनलोड करता येतील. निविदांचा संपूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एसअँडटी) यांचे कार्यालय, मुंबई सीएसटी येथील "सूचना फलका"वरसुद्धा उपलब्ध आहे.

खुली निविदा सूचना क्र. :
सीआर/बीबी/एसअँडटी/नॉर्थ/२०२२/२५/२६

रेलमदत हेल्पलाइन १३९ 377

सिडको
शहरांचे शिल्पकार

बोली मागविणारी सूचना

खारघर, नवी मुंबई येथील सेक्टर-२४ मधील इंटरनॅशनल स्टॅण्डर्ड शुटिंग रेंजच्या विकासाकरिता परिमाणांचे बिल, व्यवहार सल्लागार व बोली कागदपत्रे समाविष्ट व्यवहार्यता अध्ययन, सविस्तर लेआउट व डीपीआर तयार करणे, इ. कामे पार पाडण्याकरिता डिझाइन व आर्किटेक्चरल कन्सलटंटची नेमणूक करणे

सिडको ऑफ महाराष्ट्र लिमिटेड खाली नमूद केलेल्या कामाकरिता ज्या बोलीदारांनी **इंटरनॅशनल स्टॅण्डर्ड शुटिंग रेंजच्या विकासाकरिता परिमाणांचे बिल, व्यवहार सल्लागार व बोली कागदपत्रे समाविष्ट व्यवहार्यता अध्ययन, सविस्तर लेआउट व डीपीआर तयार करणे,** इ. तत्सम कामे पार पाडली आहेत आणि तांत्रिक बोली मूल्यांकनातील किमान अर्हताकारी एकूण १०० गुणांपैकी ७५ गुण प्राप्त केले आहेत आणि अनिवार्य पात्रता कसोट्यांची पूर्तता करीत आहेत अशा अनुभवी व भावी पात्र बोलीदारांकडून द्वि-बोली पद्धतीत (भाग १ : तांत्रिक बोली व भाग-२ : वाणिज्य बोली) ई-निविदा प्रक्रियेद्वारा **"ऑनलाइन"** एकरकमी बोली मागवीत आहेत.

१. कामाचे नाव : खारघर, नवी मुंबई येथील सेक्टर-२४ मधील इंटरनॅशनल स्टॅण्डर्ड शुटिंग रेंजच्या विकासाकरिता परिमाणांचे बिल, व्यवहार सल्लागार व बोली कागदपत्रे समाविष्ट व्यवहार्यता अध्ययन, सविस्तर लेआउट व डीपीआर तयार करणे, इ. कामे पार पाडण्याकरिता डिझाइन व आर्किटेक्चरल कन्सलटंटची नेमणूक करणे. २. सी.ए. नं. : ०१ / सिडको / ईई (सीपी) / २०२२-२३. **३. पूर्तता कालावधी :** १) परिमाणांचे बिल, व्यवहार सल्लागार व बोली कागदपत्रे समाविष्ट व्यवहार्यता अध्ययन, सविस्तर लेआउट व डीपीआर तयार करणे याकरिता अध्ययन व सादरीकरणाकरिता ९० (नव्वद) दिवस. २) संपूर्ण शुटिंग रेंज प्रोजेक्टच्या निष्पादन कालावधीत समंत्रक सेवांची तरतूद करणे. ३) कामाच्या निष्पादन कालावधीत क्वॉलिटी ऑडिट व सर्टिफिकेशन. ४) विविध सरकारी डिपार्टमेंट्सकडील सांविधिक मंजुरी मिळवणे व समन्वय साधणे. **४. बोली प्रक्रिया शुल्क :** रु. १७,७००/- (रुपये सतरा हजार सातशे फक्त) (रु. १५,०००/- बोली किंमत + जीएसटी १८% दराने) (ना परतावा). **५. इ.र.ठे. :** रु. २,००,०००.००/-. **६. निविदा प्रक्रिया :** लिस्ट कॉस्ट क्वॉलिटी बेस्ड सिलेक्शन (एलसीक्यूबीएस). बोली कार्यक्रमासह बोली कागदपत्रे १२/०८/२०२२ रोजी सायं. ०५.०१ वा. पासून mahatenders.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध असतील.

अधीक्षक अभियंता
(सीपी)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१९६/२०२२-२३

एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड
Asian Energy Services
(पूर्वीची एशियन ऑइलफिल्ड सर्व्हिसेस लिमिटेड)
सीआयएन: एल२३२००एमएच१९९२पीएलसी३१८३५३
नोंदणीकृत कार्यालय : ३ बी, ३ रा मजला, ओमकार इस्क्वेअर, चुनाभट्टी सिग्नल, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, शीव (पूर्व), मुंबई-४०००२२, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी क्र.: ०२२-४२४४ ११००; **ईमेल :** secretarial@asianenergy.com
वेबसाइट: www.asianenergy.com

30 जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीच्या अ-लेखापरीक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षाच्या विवरणाचा सारांश

(प्रति भाग माहितीव्यतिरिक्त रु. लाखांत)

तपशील	रोजी संपलेली तिमाही ३०.०६.२०२२ अलेखापरीक्षित	रोजी संपलेली तिमाही ३०.०६.२०२१ अलेखापरीक्षित
व्यवहारातील एकूण उत्पन्न (निव्वळ)	२,७४३.८६	७६९५.५६
कालावधीतील निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपूर्व)	(१०४५.२७)	१८९९.४६
कालावधीतील करपूर्व (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपश्चात) निव्वळ नफा/(तोटा)	(१०४५.२७)	१८९९.४६
कालावधीतील करोत्तर (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपश्चात) निव्वळ नफा/(तोटा)	(८४५.७८)	२०६१.५४
कालावधीतील एकूण समावेशक उत्पन्न [कालावधीतील करोत्तर नफा/ (तोटा) व अन्य समावेशक उत्पन्न (करोत्तर) समाविष्ट असलेले]	(७३८.८०)	२१३४.२०
समभाग भांडवल (प्रत्येकी रु.१०/- दर्शनी मूल्याचे)	३,७६९.३७	३,७६९.३७
राखीव निधी (लगोलग अगोदरच्या हिशोबी वर्षाच्या ताळेबंदानुसार पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून)		
प्रति भाग मिळकत (असाधारण बाबींपूर्व आणि पश्चात) (प्रत्येकी रु. १०/- चे भाग)		
''पायाभूत : (रुपयात)	(२.२४)	५.४७
सौम्यीकृत : (रुपयात)''	(२.२४)	५.४६

नोंदी: १. महत्त्वाची स्वायत्त वित्तीय माहिती खाली दिली आहे :

तपशील	रोजी संपलेली तिमाही ३०.०६.२०२२ अलेखापरीक्षित	रोजी संपलेली तिमाही ३०.०६.२०२१ अलेखापरीक्षित
व्यवहारातील उत्पन्न	२७४३.८६	७६९५.५६
करपूर्व नफा/ (तोटा)	(६७७.८६)	२३६९.०५
कालावधीतील करपूर्व (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपश्चात) निव्वळ नफा/(तोटा)	(६७७.८६)	२३६९.०५
कालावधीतील एकूण समावेशक उत्पन्न, कराच्या निव्वळ	(४७६.५६)	२५३०.६२

२. लेखापरीक्षण समितीने वरील एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचे परीक्षण केले व त्यांची शिफारस केली आणि १० ऑगस्ट २०२२ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेत संचालक मंडळाने ते अभिलेखावर घेतले.
३. वरील उतारा हा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत दी स्टॉक एक्स्चेंजकडे सादर केलेल्या, ३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांच्या सविस्तर रूपाचा सारांश आहे. ३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण रूप, स्टॉक एक्स्चेंज वेबसाइटवर म्हणजेच **www.bseindia.com** व **www.nseindia.com** मध्ये आणि कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजेच **www.asianenergy.com** मध्ये उपलब्ध आहे.

एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेडकरिता
(पूर्वीची एशियन ऑइलफिल्ड सर्व्हिसेस लिमिटेड)

आशुतोष कुमार
पूर्ण-वेळ संचालक आणि सीईओ
डीआयएन: ०६९१८५०८

स्थळ : मुंबई
दिनांक : १० ऑगस्ट २०२२

जयसिंथ डायस्टफ (इंडिया) लिमिटेड
सीआयएन : एल२४११४एमएच१९८५पीएलसी०३५५६४
नोंदणीकृत कार्यालय : ३०१, सुमेर केंद्र, पी. बी. मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०१८
दूर. क्र. : +९१ २२ ४९३८ ४२००/४३०० ◆ फॅक्स क्र. : +९१ २२ ३०४२ ३४३४ ◆ संकेतस्थळ : www.jaysynth.com ◆ ई-मेल आयडी : jsec@jaysynth.com

३० जून, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरीक्षित एकमेव आणि एकत्रीकृत वित्तीय निष्कर्षाचा आराखडा

(₹ लाखांमध्ये, ईपीएस वगळता)

अ. क्र.	तपशील	एकमेव				एकत्रीकृत			
		संपलेले त्रैमासिक			संपलेले वर्ष	संपलेले त्रैमासिक			संपलेले वर्ष
		३० जून, २०२२	३१ मार्च, २०२२	३० जून, २०२१	३१ मार्च, २०२२	३० जून, २०२२	३१ मार्च, २०२२	३० जून, २०२१	३१ मार्च २०२२
		अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१	कार्यामधून एकूण उत्पन्न	३,९७०	३,९५७	३,९२९	१६,२५८	४,०२८	४,१४२	४,०९५	१६,२३१
२	कालावधीसाठी निव्वळ नफा (कर, अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबीपूर्व)	२४१	१७५	२३९	१,०२५	२९५	१८९	२६१	१,०२९
३	करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबीपश्चात)	२४१	१७५	२३९	१,०२५	२९५	१८९	२६१	१,०२९
४	करपश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबीपश्चात)	१६१	११६	१७८	७२२	२१३	११३	१९३	७१४
५	कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी एकत्रित नफा (करपश्चात) आणि एकूण व्यापक उत्पन्न (करपश्चात)]	१३४	९६	१८९	७५५	१८६	८५	२०४	७४२
६	समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १/-)	८७	८७	८७	८७	८७	८७	८७	८७
७	**प्रति समभाग उत्पन्न (दर्शनी मूल्य ₹ १/-)** (सौम्यीकृत आणि खंडित कार्यासाठी)								
	ए) मूळ	१.८५	१.३३	२.०५	८.३०	२.४५	१.३०	२.२२	८.२१
	बी) सौम्यीकृत	१.८५	१.३३	२.०५	८.३०	२.४५	१.३०	२.२२	८.२१

टिपा :
१. ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रीकृत वित्तीय निष्कर्ष उपरोक्त नमूद करण्यात आले आहेत त्याचे लेखा समितीद्वारे निरीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे १० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या त्यांच्या सभेमध्ये ते नोंदपटावर घेण्यात आले आहे.
२. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट) नियमावली, २०१५च्या ३३च्या अनुषंगाने बीएसई लि.मध्ये सादर करावयाच्या ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रीकृत वित्तीय निष्कर्षाचा तपशीलवार आराखडा आहे. ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठीच्या वित्तीय निष्कर्षाचा पूर्ण आराखडा स्टॉक एक्स्चेंजच्या म्हणजेच **www.bseindia.com** या संकेतस्थळावर आणि कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.jaysynth.com** वर उपलब्ध आहे.
३. सदर निवेदन कंपनी कायदा २०१३च्या कलम १३३ अंतर्गत कंपनीज (इंडियन अकाऊन्टिंग स्टॅण्डर्ड्स) नियम, २०१५ (इंडि एएस)च्या मान्यतेनुसार मान्य करण्यात आले आहेत.
४. प्रति समभाग मूळ आणि सौम्य कमाईची गणना इक्विटी भागधारकांच्या करानंतरच्या नफ्याला, या कालावधीत थकबाकी असलेल्या इक्विटी समभागांच्या भारित सरासरी संख्येद्वारे केली जाते. कालावधी/ वर्षसाठी समर्पक समभागांच्या भारित सरासरी संख्येने भागलेल्या एकूण सर्वसमावेशक उत्पन्नाऐवजी संबंधित समभागांच्या सरासरी संख्येद्वारे गणनाही त्यानुसार केली गेली आहे.
५. गत वर्षाचे आकडे गरजेनुसार पुनर्गठीत/ पुनःरचित करण्यात आले आहेत.
६. कंपनीचा केवळ एकच विभाग आहे.

जयसिंथ डायस्टफ (इंडिया) लिमिटेडकरिता
संचालक मंडळाच्या वतीने आणि करिता
सही/-
पराग शरदचंद्र कोठारी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ००१८४८५२

ठिकाण : मुंबई
दिनांक : १० ऑगस्ट, २०२२